गुरुमाऊली
एक शैक्षणिक व्यासपीठ

Subscribe इयत्ता – सातवी (28 जून) विषय – मराठी Subscribe

शाळापूर्व तयारी – उपचारात्मक ब्रीज कोर्स (15 ते 30 जून)

मागील इयत्तेच्या अध्ययन निष्पत्तीवर आधारित अभ्यासक्रम समाविष्ट

टेस्ट सोडवा

वाचा व सोडवा.

सर्वनाम	सार्वनामिक विशेषण
मी	माझा, माझी
तू	तुझा, तुझी
तो	त्याचा
ती	तिचा, तिची, तिचे
आम्ही	आमचा, आमची
तुम्ही	तुमचा
हा	असा, असला, इतका, अमका, एवढा
तो	तसा, तसला, तितका, तेवढा, तमका
जो	जसा, जसला, जितका, जेवढा
कोण	कोणता, केवढा
काय	कसा, कसला

- खालील दिलेल्या विरामचिन्हांची चौकटींत नावे लिहा.

?		.	
,		–	
“ ”		‘ ’	
;		!	

- खाली चार चित्रे दिलेली आहेत. त्यांचा सहसंबंध लावून तुमच्या शब्दांत कथा तयार करा व सांगा.

वाचा व सोडवा.

टेस्ट सोडवा

सरावसंच 25

1. खालील संख्यांचा लसावि काढा.

(1) 9, 15 (2) 2, 3, 5 (3) 12, 28 (4) 15, 20 (5) 8, 11

2. खालील उदाहरणे सोडवा.

(1) कवायतीसाठी पटांगणावरील मुलांच्या प्रत्येक रांगेत 20 मुले किंवा प्रत्येक रांगेत 25 मुले राहतील अशा रांगा केल्यास, रांगा पूर्ण होतात व एकही मुलगा शिल्लक राहत नाही, तर त्या शाळेत कमीत कमी किती मुले आहेत ?

(2) वीणाजवळ काही मणी आहेत. तिला समान मणी असलेल्या माळा तयार करायच्या आहेत. तिने 16, 24 किंवा 40 मण्यांच्या माळा केल्या तर एकही मणी शिल्लक राहत नाही, तर तिच्याजवळ कमीत कमी किती मणी आहेत ?

(3) तीन वेगवेगळ्या डब्यांत समान संख्येचे लाडू ठेवले. पहिल्या डब्यातील लाडू 20 मुलांना, दुसऱ्या डब्यातील लाडू 24 मुलांना व तिसऱ्या डब्यातील लाडू 12 मुलांना समान वाटले. एकही लाडू उरला नाही, तर तीनही डब्यात मिळून एकूण कमीत कमी किती लाडू होते ?

(4) एका शहरात एकाच मोठ्या रस्त्यावरील तीन वेगवेगळ्या चौकांतील सिग्नल पाहिले. ते दर 60 सेकंद, 120 सेकंद व 24 सेकंदांनी हिरवे होतात. सकाळी 8 वाजता सिग्नल चालू केला, तेव्हा तीनही सिग्नल हिरवे होते. त्यानंतर किती वेळाने तीनही सिग्नल एकाच वेळी पुन्हा हिरवे होतील ?

(5) $\frac{13}{45}$ व $\frac{22}{75}$ या व्यवहारी अपूर्णांकांचे सममूल्य समच्छेद अपूर्णांक शोधा व त्यांची बेरीज करा.

गणिती कोडे!

एका बाजूस संख्या आणि दुसऱ्या बाजूस माहिती लिहिली आहे, असे चार कागद आपल्याकडे आहेत. कागदांवरील संख्या 7, 2, 15, 5 अशा आहेत आणि कागदांवरील माहिती खालीलप्रमाणे आहे. (माहितीचा क्रम भिन्न आहे.)

(I) 7 ने भाग जाणारी संख्या (II) मूळ संख्या

(III) विषम संख्या (IV) 100 पेक्षा मोठी संख्या

जर प्रत्येक कागदावरील संख्या त्या कागदाच्या मागे लिहिलेल्या माहितीशी विसंगत आहे, तर '100 पेक्षा मोठी संख्या' अशी माहिती असलेल्या कागदावरील मागची संख्या कोणती ?

Read and solve.

Practice Set 25

1. Find out the LCM of the following numbers.

   (1) 9, 15 (2) 2, 3, 5 (3) 12, 28 (4) 15, 20 (5) 8, 11

2. Solve the following problems.

   (1) On the playground, if the children are made to stand for drill either 20 to a row or 25 to a row, all rows are complete and no child is left out. What is the lowest possible number of children in that school?

   (2) Veena has some beads. She wants to make necklaces with an equal number of beads in each. If she makes necklaces of 16 or 24 or 40 beads, there is no bead left over. What is the least number of beads with her?

   (3) An equal number of laddoos have been placed in 3 different boxes. The laddoos in the first box were distributed among 20 children equally, the laddoos in the second box among 24 children and those in the third box among 12 children. Not a single laddoo was left over. Then, what was the minimum number of laddoos in the three boxes altogether?

   (4) We observed the traffic lights at three different squares on the same big road. They turn green every 60 seconds, 120 seconds and 24 seconds. When the signals were switched on at 8 o'clock in the morning, all the lights were green. How long after that will all three signals turn green simultaneously again?

   (5) Given the fractions $\frac{13}{45}$ and $\frac{22}{75}$ write their equivalent fractions with same denominators and add the fractions.

A Maths Riddle!

We have four papers. On each of them there is a number on one side and some information on the other. The numbers on the papers are 7, 2, 15, 5. The information on the papers is given below in random order.

(I) A number divisible by 7. (II) A prime number

(III) An odd number (IV) A number greater than 100

If the number on every paper is mismatched with the information on its other side, what is the number on the paper which says 'A number greater than 100'?

Read and practice. (वाचा आणि सराव करा.)

टेस्ट सोडवा

POINTERS

1. **Form groups of three. Play the roles of the narrator the Duck and the Kangaroo and read the poem aloud with proper pauses and intonation.**

---

2. **Read aloud the following words. Note the difference in the long and the short vowel sounds.**
   - fit-feet
   - bit-beat
   - hit-heat
   - sit-seat
   - pick-peak
   - chick-cheek
   - tick-teak
   - lick-leak

   Find other pairs of words with long and short vowel sounds.
   Example : pen-pain,

---

3. **Put the following events in the order in which they took place.**

   (a) The Duck told the Kangaroo about his wish.

   (b) The Duck was bored.

   (c) The Duck lived in a pond.

   (d) The Kangaroo agreed to take the Duck with him.

   (e) The Kangaroo thought about it.

   (f) The Duck decided to talk to the Kangaroo.

   (g) The Duck and the Kangaroo travelled round the world three times.

   (h) The Duck bought four pairs of socks.

---

4. **Use other words in place of the highlighted words to make meaningful sentences.**
   - How you hop !
   - As if you would never stop !
   - I long to go out in the world.
   - I wish I could hop like you !
   - Who so happy, O Who, as the Duck and the Kangaroo ?



टेस्ट सोडवा

वाचून समजून घ्या.सोडवा.

पंचायत समितीची कामे



विकास गटात कोणती कामे केली पाहिजेत, त्या योजनांचा आराखडा पंचायत समिती तयार करते. प्रत्येक महिन्यात पंचायत समितीची किमान एक तरी सभा होणे आवश्यक असते.

पंचायत समितीला जिल्हा निधीतून काही रक्कम मिळते. विकास गटात करायच्या विकासाच्या योजनांसाठी पंचायत समितीला राज्यशासनाकडूनही अनुदान मिळते.

३.३ जिल्हा परिषद

प्रत्येक जिल्ह्यासाठी एक जिल्हा परिषद असते. महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे आहेत परंतु जिल्हा परिषदा मात्र ३४ आहेत. कारण मुंबई (शहर) जिल्हा व मुंबई उपनगर जिल्हा हे ग्रामीण लोकवस्तीचे भाग नाहीत म्हणून त्यांच्यासाठी जिल्हा परिषदा नाहीत.

जिल्हा परिषदेचे पदाधिकारी : जिल्हा परिषदेच्या निवडणुका दर पाच वर्षांनी होतात. निवडून आलेले प्रतिनिधी आपल्यापैकी एकाची अध्यक्ष आणि एकाची उपाध्यक्ष म्हणून निवड करतात.

जिल्हा परिषदेच्या सभांचे अध्यक्षपद जिल्हा परिषद अध्यक्षाकडे असते. सभांचे कामकाज त्याच्या नियंत्रणाखाली चालते. जिल्हा परिषदेच्या आर्थिक व्यवहारांवर अध्यक्षाचे नियंत्रण असते.

जिल्हा परिषदेच्या निधीतून योग्य तो खर्च करण्याचा अधिकार जिल्हा परिषदेच्या अध्यक्षाला असतो. अध्यक्षाच्या गैरहजेरीत ही सर्व कामे उपाध्यक्ष पार पाडतो.

माहीत आहे का तुम्हांला ?

जिल्हा परिषदेचा कारभार कसा चालतो ?

जिल्हा परिषदेचा कारभार विविध समित्यांमार्फत चालवला जातो. वित्त समिती, कृषी समिती, शिक्षण समिती, आरोग्य समिती, जलव्यवस्थापन व स्वच्छता समिती इत्यादी. महिला व बालकल्याण समिती महिलांचे आणि बालकांचे प्रश्न विचारात घेते.

मुख्य कार्यकारी अधिकारी : जिल्हा परिषदेने घेतलेल्या निर्णयांची प्रत्यक्ष अंमलबजावणी जिल्हा परिषदेचा मुख्य कार्यकारी अधिकारी करतो. त्याची नेमणूक राज्यशासन करते.

पाठ वाचा व समजून घ्या.

टेस्ट सोडवा

- पृष्ठ ५१ वरील आकृत्यांमधील कोणती ऊर्जा साधने विनामूल्य मिळतात ?

भौगोलिक स्पष्टीकरण

आपल्या गरजा भागवण्यासाठी आपण विविध गोष्टी करत असतो. यासाठी आपल्याला ऊर्जेची गरज भासते. पूर्वी मानवी श्रमाचा व प्राण्यांचा वापर करून कामे केली जात असत. मानवाच्या गरजा जसजशा वाढत गेल्या तसतसा ऊर्जा साधनांच्या व ऊर्जा स्रोतांच्या वापरामध्येही बदल होत गेला. ही ऊर्जा मानव मुख्यत्वेकरून निसर्गातूनच मिळवतो. वरील प्रश्नांच्या उत्तरांवरून हे आपल्या सहज लक्षात येईल. पेट्रोल, वारा, नैसर्गिक वायू, सूर्यप्रकाश, इत्यादी ऊर्जा साधनांचा वापर आपण करतो. याशिवाय इतरही ऊर्जा साधने आहेत.

ऊर्जा साधनांचे अनेक प्रकारे वर्गीकरण करता येते. यांत प्रामुख्याने पारंपरिक – अपारंपरिक, जैविक – अजैविक, नूतनीकरणीय–अनूतनीकरणीय, पदार्थांवर आधारित – प्रक्रियांवर आधारित इत्यादी. आपण पदार्थांवर आधारित व प्रक्रियांवर आधारित या वर्गीकरणाचा विचार करणार आहोत. पुढील तक्त्यातून या वर्गीकरणाच्या आधारे ऊर्जा साधनांची वैशिष्ट्ये जाणून घेऊ या.

पदार्थांवर आधारित ऊर्जा साधने	प्रक्रियांवर आधारित ऊर्जा साधने
उदा., लाकूड, कोळसा, खनिज तेल, नैसर्गिक वायू, कचरा, अणू.	उदा., सौर, पवन (वारा), पाणी, भरती–ओहोटी व भूगर्भीय उष्णता.
पदार्थ कायमस्वरूपी राहत नाहीत.	नैसर्गिक प्रक्रिया कायमस्वरूपी राहतात.
पदार्थ एकदा वापरल्यानंतर संपतात.	सातत्याने उपलब्ध असते.
पुनर्वापर होत नाही.	पुनर्वापर करता येतो.
मर्यादित स्वरूपात उपलब्ध असते.	मुबलक स्वरूपात उपलब्ध असते.
निसर्गतः नवीकरणीय होण्यासाठी हजारों वर्षांचा कालावधी लागतो.	निसर्गतः सहज उपलब्ध होतात.
अणुऊर्जा सोडून इतर सर्व साधने जैविक आहेत.	प्रक्रिया नैसर्गिक आहेत.
ऊर्जा निर्मितीच्या वेळेस प्रदूषण होते.	स्वच्छ व प्रदूषण विरहित ऊर्जा साधने
अणुऊर्जा सोडून इतर सर्व ऊर्जा साधनांना पारंपरिक ऊर्जा साधने म्हणतात.	ही सर्व ऊर्जा साधने अपारंपरिक आहेत.
ऊर्जा साधने निर्मितीच्या दृष्टीने किफायतशीर आहेत.	या ऊर्जा साधनांच्या वापरासाठी लागणारे तंत्रज्ञान विकसित करणे खर्चिक असते.
दूरगामी विचार करता ही ऊर्जा साधने ज्वलनशील असल्यामुळे पर्यावरणाच्या दृष्टीने हानिकारक आहेत.	दूरगामी विचार करता ही ऊर्जा साधने पर्यावरण पूरक आहेत.
विद्युत निर्मिती प्रकार : औष्णिक व अणू	विद्युत निर्मिती प्रकार : औष्णिक व गतिज

टेस्ट सोडवा

बलाचे प्रकार

१. स्नायू बल

१०.३ : वजन उचलणे

चित्र १०.१ मध्ये होणाऱ्या सर्व क्रियांमध्ये शरीरातील हाडे व स्नायूंच्या साहाय्याने हालचाली घडून येतात. शेजारील चित्रामध्ये वजन उचलणारी व्यक्ती स्नायू बलाचा वापर करून वजन उचलते.

स्नायूंच्या साहाय्याने लावलेल्या बलाला स्नायू बल म्हणतात.

जरा डोके चालवा.

तुम्ही रोजच्या जीवनात स्नायू बलाचा वापर करून कोणती कामे करता?

२. यांत्रिक बल

१०.४ : यंत्रे

अनेक कामे करण्यासाठी आपण वेगवेगळ्या यंत्रांचा वापर करतो. काही यंत्रे चालवण्यासाठी स्नायू बलाचा वापर होतो. काही यंत्रे ही विजेचा अथवा इंधनांचा वापर करून चालवली जातात. अशा यंत्रांना **'स्वयंचलित यंत्रे'** म्हणतात. कारण या ठिकाणी यांत्रिक बल वापरले जाते. उदाहरणार्थ, शिलाई मशीन, विद्युत पंप, वॉशिंग मशीन, मिक्सर इत्यादी. यंत्रांचा वापर करून आपण अनेक कामे करतो. त्यांची यादी करा.

यंत्रामार्फत लावल्या गेलेल्या बलाला यांत्रिक बल म्हणतात.

३. गुरुत्वीय बल



१०.५ चेंडू व फळ खाली पडणे

एखादी वस्तू बल लावून वर फेकली, की थोड्या उंचीवर जाऊन ती परत खाली येते. असे का होते?

झाडावरील फळे जमिनीवर का पडतात?

पृथ्वी सर्व वस्तू स्वतःकडे खेचते.

पृथ्वी जे बल लावून वस्तूंना आपल्याकडे खेचते त्यास गुरुत्वीय बल म्हणतात.

असे होऊन गेले

गुरुत्वाकर्षणाचा शोध सर आयझॅक न्यूटन यांनी १७ व्या शतकात लावला. पृथ्वीचे गुरुत्वीय बल हे नेहमी वर जाणाऱ्या वस्तूच्या विरुद्ध दिशेने असते त्यामुळे वर फेकलेल्या वस्तूची गती कमी कमी होत जाते व शेवटी ती शून्य होते. मग ती वस्तू आणखी वर न जाता खाली पडायला लागते. खाली पडताना तिच्या गतीत गुरुत्वीय बलामुळेच सतत वाढ होत जाते.

Types of force

1. Muscular force

In all the actions shown in the picture 10.1, the movements take place with the help of the bones and muscles in the body. The person in the picture alongside is lifting the weight by using muscular force.

10.3 : Lifting a weight

The force applied with the help of muscles is called muscular force.

Use your brain power!

For which tasks in your day-to-day life do you use muscular force?

2. Mechanical force

We use different machines for doing many tasks. Muscular force is used for running some machines. Some machines are run by using electricity or fuel. Machines like the latter are called 'automatic machines', because a mechanical force is used here. For example, sewing machine, electric pump, washing machine, mixer, etc. Make a list of other such machines.

10.4 : Machines

The force applied by means of a machine is called mechanical force.

3. Gravitational force

If an object is thrown upward by applying force, it reaches a certain height and comes down again. Why is this so?

Why do fruits on trees fall to the ground?

The earth pulls all the objects towards itself.



10.5 : Falling down of a ball and a mango

The force applied by the earth to pull objects towards itself is called gravitational force.

In the past ...

Sir Isaac Newton discovered gravitation in the 17th century. The earth's gravitational force acts in a direction opposite to that of an object moving upwards. Hence, the speed of that object goes on decreasing till in the end it becomes zero. Then the object starts falling down instead of going up any further. While falling, its speed goes on increasing all the time due to gravitational force.

● देखो, समझो और चर्चा करो :

१. उपयोग हमारे

डाकघर

स्वयंमूल्यमापन चाचणी पहा खालील लिंकवर..

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

माझा ऑनलाईन अभ्यास – प्रत्येक घटकाच्या टेस्ट सोडवा खालील लिंकवरून

सातवी मराठी	सातवी गणित	सेमी गणित	सातवी इंग्रजी	सातवी इतिहास
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

सातवी भूगोल	सातवी विज्ञान	सेमी विज्ञान	सातवी हिंदी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

दररोजच्या माझा अभ्यास pdf तुम्हाला खालील लिंकवर मिळतील.

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा

इतर इयत्तांच्या ऑनलाईन टेस्ट सोडवा खालील लिंकवरून...

पहिली	दुसरी	तिसरी	चौथी	पाचवी	सहावी	सातवी
क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा	क्लिक करा